**वादी तर्फे वादीचा अतिरिक्त सरतपास – श्री. एस. एस. इंजल वकील.**

**९.** आता मला मी दि.०४.११.२०१९ रोजी प्रतिवादीला दिलेल्या नोटीशीची प्रत दाखवली. तिला **नि. क्र.५१** देण्यात येतो. आता मला सदर नोटीस प्रतिवादीला पाठवल्याच्या पोस्टाच्या पावत्या दाखवल्या. त्यांना अनुक्रमे **नि.क्र. ५२ व ५३** देण्यात येतात. आता मला प्रतिवादीने दिलेल्या नोटीस उत्तराची प्रत दाखवली. तिला **नि.क्र. ५४** देण्यात येतो.

**सरतपास पुर्ण.**

**प्रतिवादी तर्फे उलटतपास – श्री. एस. बी. मोहिते, वकील.**

**१०.** माझे बी. कॉमचे शिक्षण झालेले आहे. मी सद्या कोणताही व्यवसाय करत नाही. माझ्या गावची अंदाजे २००० लोकसंख्या आहे. मी कोवाडे येथे राहत असल्यामुळे मी गावातील बहुतांश लोकांना ओळखतो. माझी या प्रकरणा व्यतिरिक्त गडहिंग्लज न्यायालयात एक प्रकरण होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे मला न्यायालयात पुरावा देण्याचा अनुभव आहे.

**११.** मी हा दावा, त्यासोबत दाखल केलेली कागदपत्रे, माझे शपथपत्र वाचून पाहिलेले असून दाव्यासोबत दाखल केलेले जुने उतारे पाहिलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मला माझे शपथपत्र दाखल करतेवेळी चांगल्या प्रकारे दिसत होते. माझ्या डोळ्याचे ऑपरेशन झालेले आहे. मला आता डोळ्याने चांगले दिसत नसल्यामुळे लोकांकडून वाचून घ्यावे लागते. मला दैनंदिन कामाकरिता घराबाहेर जायचे असल्यास मदतनीसाची गरज पडते.

**१२.** मी आज रोजी माझ्या शपथपत्रातील मजकूर वाचून पाहू शकत नाही. दावा मिळकत आमच्या गावाच्या बस स्टॅन्डच्या बाजूला असून तीला पुर्वी पाटाची मशार जमीन असे म्हणत होते. हे म्हणणे खरे नाही की, मी पुर्वी व आज देखील गावाच्या राजकारणात सक्रीय आहे. आमच्या गावामध्ये ब्रम्हनाथ विकास सेवा संस्था आणि सातेरी व मिनाताई ठाकरे दुध संस्था आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी एन १९९६ ते २०२२ पर्यंत ब्रम्हनाथ विकास संस्था व सातेरी दुध संस्थेचा चेअरमन व सदस्य म्हणून कार्यरत होतो.

**१३**. मला माझ्या शिक्षणामुळे बँक व्यवहार माहिती आहे. मला प्रतिवादीला नि.क्र. ५१ प्रमाणे पाठवलेल्या नोटीशीची तारीख व वार सांगता येणार नाही. मला त्या नोटीशीमध्ये नमुद केलेल्या चतुःसिमा आता आठवत नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीला खोटी व बेकायदेशीर नोटीस पाठवलेली आहे. मी सदर नोटीस करवीरकर वकीलांमार्फत पाठवली होती. मी दिलेल्या नोटीशीमधील जमीनीचा गट क्र. ६१ असावा. त्याचे संपूर्ण क्षेत्र ९ गुंठे आहे.

**१४**. मला प्रतिवादीला नेमकी कोणती प्रापंचिक अडचण होती याबाबत माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने कधीही मला दावा मिळकतीची विक्री करण्याबाबत बोलून दाखवले नव्हते. मला दाव्यातील चतुःसिमा सांगता येतील. दावा मिळकतीच्या पुर्वेकडील रस्त्याच्या पलीकडील जमीनीचा गट क्रमांक मला सांगता येणार नाही. मला सदर मिळकतीच्या पश्चिम व उत्तरेकडील माझ्या मिळकतीचे गट क्रमांक सांगता येणार नाहीत. दावा मिळकतीचे क्षेत्र २.५ आर असून ती २० फुट रुंदीची असून १३६ फुट पेक्षा लांबीची आहे. दावा मिळकत घेण्याबाबत करारनामा करण्यापूर्वी तीन ते चार दिवस अगोदर बैठक झाली होती. त्या बैठकीला मी, प्रतिवादी व करारावरील साक्षीदार नारायण पवार हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, नारायण पवारचे नाव प्रतिवादीला दिलेल्या नोटीशीत, दाव्यात आणि माझ्या शपथपत्रात नमुद नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने मला कधीही वादातील करारनामा करून दिलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, करारनाम्यातील संपूर्ण मजकुर खोटा व बनावट आहे.

**१५.** हे म्हणणे खरे नाही की, माझ्या दाव्यातील व शपथपत्रातील परिच्छेद क्र. ३ चा मजकूर खोटा व लबाडीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने मला दावा मिळकतीचा करारनाम्याने ताबा दिल्याचे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी दावा मिळकतीत माझी शांततामय ताबे वहिवाट असल्याचे खोटे सांगत आहे. माझ्याकडे दावा मिळकतीचा ताबा घेतल्याबाबतचा करारनाम्या व्यतिरिक्त वेगळा कागद नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी कोणतेही कारण नसताना खोटा दावा दाखल केला आहे. दावा मिळकती ही प्रतिवादीची वडीलोपार्जित मिळकत आहे.

**१६**. मी प्रतिवादीसोबत करारनामा करण्यापूर्वी वर्तमान पत्रात जाहिर नोटीस दिली

नव्हती. मी दावा मिळकत खरेदी करण्यापूर्वी तिच्या मालकी हक्काबाबत चौकशी केली होती. मी त्याबाबतचा सन २००९ सालचा उतारा पाहिला होता. मी त्याची प्रत न्यायालयात दाखल केलेली आहे. त्यावरती प्रतिवादी सोबत त्याच्या आई व बहिणीचे नाव होते. प्रतिवादीच्या नावे दावा मिळकतीचा स्वतंत्र ८/अ असल्यामुळे मला इतर लोकांना दाव्यात पक्षकार करण्याची आवश्यकता वाटली नाही. मी प्रतिवादीच्या आई व बहिणीची करारनाम्यासाठी मान्यता घेतली नाही.

**१७**. मला प्रतिवादीच्या ८/अ उता–याचा क्रमांक सांगता येणार नाही. मला दावा मिळकतीवरील बोजाची माहिती घेतल्याचे आता आठवत नाही. दावा मिळकत ही पडीक जमीन आहे. दावा मिळकतीला आज देखील प्रतिवादीचे नाव आहे. मी दावा मिळकतीच्या महसुल उता–यांना नाव लावण्यासाठी कोणताही अर्ज दिला नव्हता.

**१८**. वादातील करारनाम्याचा स्टॅम्प प्रतिवादीने आणलेला होता. त्याने माझ्या समक्ष तो स्टॅम्प खरेदी केला होता. दावा मिळकत ही वर्ग २ ची जमीन आहे. मला दावा मिळकत वर्ग २ ची असल्यामुळे तिची विक्री अथवा त्याबाबतचा करारनामा करता येऊ शकत नसल्याचे माहिती नाही. वादातील करारनामा ८.९.२००९ साली करण्यात आला होता. वादातील करारनामा आज–यातील लतिफ यांच्याकडे करण्यात आला होता. कराराचा स्टॅम्प लतिफ यांच्या दुकानातुन घेण्यात आला होता. त्याबाबतची त्याने त्याच्या रजिस्टरला नोंद घेतली होती.

**१९.** करारपत्र लिहिताना मी, प्रतिवादी, साक्षीदार नारायण पवार व प्रतिवादीने आज–यातील बोलावलेला साक्षीदार आर. जी. डोणकर हजर होता. वादातील करारपत्र करण्यासाठी एक ते दिड तासाचा वेळ लागला होता. तो करारनामा दुपारी एक ते दिड वाजेच्या दरम्यान करण्यात आला होता. प्रतिवादीने करारपत्रातील संपूर्ण मजकुर सांगितला होता. तो करारनामा अब्दुल लतिफ याने लिहिलेला आहे. तो करारनामा लिहिण्यासाठी लतिफ याला प्रतिवादीने दावा मिळकतीचा ७/१२ उतारा दिला होता. वादातील करारपत्रासोबत ७/१२ व ८/अ चा उतारा जोडलेला असावा. करारपत्रासोबत सदर कागदपत्रे जोडलेली असावीत. त्यावरती लिहून देणार–घेणार अथवा साक्षीदारांचे फोटो नाहीत.

**२०.** करारनामा करतेवेळी लतिफ याने आमच्याकडे ओळखीचे पुरावे मागितले नव्हते. करारनाम्याची मुदत ९९ वर्षे ठरली होती. मला करारनाम्यासोबत दावा मिळकतीच्या लांबी रुंदीच्या क्षेत्राचा कच्चा नकाशा तयार केल्याचे आठवत नाही. मला वीस हजारांपेक्षा जास्त रक्कमेचा व्यवहार धनादेशाने अथवा डी.डी. ने करावा लागतो याची माहिती आहे. मला जमीनीचा व्यवहार रजिस्टर ऑफिसला नोंदवावा लागतो याची माहिती आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी कधीही प्रतिवादीला करारात ठरलेली रक्कम दिलेली नाही. करारनाम्यामध्ये प्रतिवादीला रक्कम मिळाल्याचे नमुद असल्यामुळे मी स्वतंत्र पावती घेतलेली नाही. मी प्रतिवादीला पैसे मिळाल्याबाबत स्वतंत्र पोहोच पावती घेतलेली नाही.

**२१**. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी आमच्या दुध संस्थेला दुध घालत होता. हे म्हणणे खरे नाही की, मी संस्थेमार्फत सभासदांना म्हैसीसाठी कर्ज प्रकरण करून देत होतो. हे म्हणणे खरे नाही की, मी सन २००९ मध्ये प्रतिवादीला म्हैस खरेदी प्रकरण करायचे आहे असे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी त्याकरिता प्रतिवादीला १००/– रुपयांचा स्टॅम्प घेवून यायला सांगितला होता. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने माझ्यावर विश्वास ठेवून मला सन २००९ साली १००/– रुपयांचा कोरा स्टॅम्प पेपर दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, म्हैस कर्जाचे प्रकरण झालेले नसल्यामुळे प्रतिवादीने माझ्याकडे विचारपूस केली असता मी त्याला वरिष्ठ कार्यालयात पाठविल्याचे सांगितले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीला त्याचा १००/– रुपयांचा स्टॅम्प परत देण्याचे आश्वासन दिले होते.

**२२**. माझे सन २००९ व आज देखील प्रतिवादीसोबत संबंध चांगले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे प्रतिवादीने माझ्याकडे ठेवलेल्या १००/– रुपयांच्या स्टॅम्पबाबत कोठेही तक्रार केली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीला त्याचा स्टॅम्प देत नसल्यामुळे त्याने मिनाताई ठाकरे दुध संस्थेत दुध घालायला सुरूवात केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्या रागापोटी मी प्रतिवादीकडून २००९ साली घेतलेल्या को–या स्टॅम्पचा गैरवापर करून वादातील करारनामा केलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी वादातील बनावट करारनामा स्वतः करून घेतलेला असून त्यावरती प्रतिवादीची

स्वाक्षरी नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटया करारनाम्याच्या आधारे प्रतिवादीची जमीन लुबाडण्यासाठी खोटी केस दाखल केली आहे.

**२३.** मी करारनाम्याच्या पुर्ततेसाठी २०२१ साली दावा दाखल केला आहे. प्रतिवादी वेळोवेळी मागणी करून देखील कराराची पुर्तता करायला तयार नसल्यामुळे दावा दाखल केला आहे. मी प्रतिवादीला समक्ष भेटून करारनामा पुर्ण करून देण्याची मागणी करत होतो. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादीने कोणताही करारनामा करून दिलेला नसून मी त्याच्या पुर्ततेसाठी त्याची कधीही भेट घेतलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी प्रतिवादीकडून घेतलेल्या १००/- रुपयांच्या स्टॅम्पचा गैरवापर करून खोटा करारनामा तयार करून आज खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

Digitally signed by RAVI PANDURANG THORE

(आर. पी. थोरे)

दिनांक – २०.११.२०२५. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, आजरा.